**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मॉरिशस दौऱ्यावर
- येत्या तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उघडण्यात येणार
- २०२४-२५ या वर्षासाठी प्रमुख पिकांच्या उत्पादनाचा दुसरा आगाऊ अंदाज जाहीर
- उडदाच्या शुल्कमुक्त आयातीला पुढच्या वर्षी ३१ मार्च २०२६ पर्यंत आणखी एका वर्षाची मुदतवाढ

**आणि**

- क्रीडा मंत्रालयानं भारतीय कुस्ती महासंघावरचं निलंबन उठवलं

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मॉरिशसच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आज सकाळी पोर्ट लुईस इथं पोहोचले. मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन चंद्र रामगुलाम यांनी विमान तळावर त्यांचं स्वागत केलं. प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी तिथला भारतीय समुदाय मोठ्या संख्येनं उपस्थित होता. मॉरिशस हा भारताचा हिंद - महासागर क्षेत्रातला महत्त्वाचा शेजारी देश असून, त्याच्याबरोबर विविध क्षेत्रात भागीदारी वाढवण्यासाठी तसंच हिंदी महासागर क्षेत्रात सुरक्षा आणि विकासासाठी मॉरीशसच्या नेत्यांबरोबर संवाद साधण्यासाठी उत्सुक असल्याचं मोदी यांनी मॉरिशसला निघताना नमूद केलं होतं. प्रधानमंत्री मोदी उद्या होणाऱ्या मॉरिशसच्या ५७ व्या राष्ट्रीय दिवस सोहळ्याचे प्रमुख पाहुणे आहेत. ते आज राष्ट्रपती धरम गोकुळ आणि मॉरिशसचे

प्रधानमंत्री नवीन चंद्र रामगुलाम यांची भेट घेऊन विविध मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

<><><><><><>

येत्या तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उघडण्यात येतील, अशी माहिती आज राज्यसभेत केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. पुढच्या आर्थिक वर्षात दोनशे डे केअर कॅन्सर सेंटर उघडली जातील, असंही नड्डा म्हणाले. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी दोन मतदारांना एकच ओळखपत्र क्रमांक जारी झाल्यासंदर्भातले स्थगन प्रस्ताव उपाध्यक्ष हरिवंश यांच्यासमोर सादर केले. हरिवंश यांनी ते फेटाळून लावले आणि दक्षिणेकडच्या राज्यांमधल्या सीमांकनाचा प्रस्ताव मांडला. त्यावरून द्रमुक, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि इतर पक्ष सदस्यांनी घोषणबाजी सुरू केली. उपाध्यक्षांनी त्यांना आपापल्या जागी परत जाऊन कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन केलं. मात्र, तरीही गदारोळ सुरूच राहिल्याने राज्यसभेचं कामकाज आज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांच्या विरोधात केलेल्या टिप्पणीवरून आज लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी आणि सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांमध्ये जोरदार वाद झाला. प्रश्नोत्तराच्या तासांदरम्यान, बॅनर्जी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याशी संबंधित पश्चिम बंगालच्या कथित विलंबित निधीचा मुद्दा उपस्थित करताना सिंह यांच्याविरोधात टिप्पणी केली. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी या टिप्पणीवर आक्षेप घेतला. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनीही बॅनर्जी यांच्या वक्तव्याचा निषेध केला. दरम्यान, सभापती ओम बिर्ला यांनी सर्व सदस्यांना एकमेकावर टिप्पणी न करण्याचं आणि सभागृहात सुव्यवस्था राखण्याचं आवाहन केलं. प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेत अद्याप सहभागी नसलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये अर्थसहाय्य

द्यायला सरकार तयार असल्याचं प्रतिपादन कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत केलं. केंद्र सरकार कोणत्याही राज्यांच्या बाबतीत भेदभाव करत नाही, अशी ग्वाही चौहान यांनी तमिळनाडूबद्दलच्या प्रश्नाच्या उत्तरादाखल दिली.

<><><><><>

पंजाबच्या केंद्रीय विद्यापीठात केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातील संस्कृतींचा मिलाफ दिसून येतो आणि इथल्या विद्यार्थी तसंच शिक्षकांमध्ये भारतातल्या विविधतेचं प्रतिबिंब उमटलेलं दिसतं असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. पंजाबातल्या बठिंडा विद्यापीठाच्या १० व्या दीक्षांत समारंभात त्या आज बोलत होत्या. बठिंडा जवळ  तलंवडी इथल्या तखत श्री दमदमा साहिब इथं गुरु नानक देवांनी त्यांच्या संघर्षमय जीवनातला काही काळ घालवला होता, अशा महत्वाच्या स्थानामधील अध्यात्मिक ऊर्जा आणि वीररस इथेही जाणवत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. या दीक्षांत समारंभात गुणवान विद्यार्थ्यांना १ हजार ३१ पदव्या तसेच ६३ पी एच डी आणि ४३ सुवर्णपदकांचं वितरण करण्यात आलं.

<><><><><>

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं २०२४-२५ या वर्षासाठी प्रमुख पिकांच्या उत्पादनाचा दुसरा आगाऊ अंदाज जाहीर केला आहे. त्यानुसार खरीप अन्नधान्य उत्पादन एक हजार ६६४ लाख मेट्रिक टन तर रब्बी अन्नधान्य उत्पादन एक हजार ६४५ लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. या वर्षासाठी तांदळाचं उत्पादन एक हजार २०६ लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. २०२३-२४ मध्ये हे उत्पादन एक हजार १३२ लाख मेट्रिक टन होतं . तूर आणि हरभऱ्याचं  उत्पादन अनुक्रमे ३५ लाख ११ हजार मेट्रिक टन आणि ११५  लाख ३५ हजार मेट्रिक टन होण्याचा अंदाज आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकार सातत्यानं काम करत असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ही आकडेवारी जाहीर करताना सांगितलं. कृषी मंत्रालयाच्या विविध

योजनांमुळे शेतकऱ्यांना मदत आणि प्रोत्साहन मिळत असून त्यामुळे कृषी उत्पादनात विक्रमी वाढ होत असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं.

<><><><><><>

केंद्र सरकारनं उडदाच्या शुल्कमुक्त आयातीला पुढच्या वर्षी ३१ मार्च २०२६ पर्यंत आणखी एका वर्षाची मुदतवाढ दिली आहे. यासंदर्भातली अधिसूचना परकीय व्यापार महासंचालनालयानं जारी केली. उडदाच्या शुल्कमुक्त आयातीची मुदत यावर्षी ३१ मार्चला संपणार होती. या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारपेठेत वस्तू मालाच्या किमती स्थिर राहायला मदत होईल, असं सरकारनं म्हटलं आहे. भारत म्यानमार कडून उडदाची सर्वाधिक आयात करतो. या आर्थिक वर्षात एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत भारतानं ६० कोटी ११ लाख २० हजार अमेरिकी डॉलर इतक्या मूल्याची आयात केली आहे. त्यापैकी ५४ कोटी ९० लाख अमेरिकी डॉलर मूल्याची धान्य आयात म्यानमारमधून केली गेली आहे. म्यानमारसोबतच भारत सिंगापूर, थायलंड आणि ब्राझीलमधून उडदाची आयात करत आला आहे. त्याचवेळी मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू आणि महाराष्ट्र ही देशातली उडदाची प्रमुख उत्पादक राज्य असून, भारत हा जगातला उडदाचा सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक देश आहे.

<><><><><><>

छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त मुंबईच्या विधानभवन परिसरात आज त्यांना अभिवादन करण्यात आलं. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.

मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ मोहन यादव यांनीही छत्रपती संभाजी महाराजांना समाजमाध्यमावरच्या संदेशात अभिवादन केलं आहे.

<><><><><><>

महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांत एक लाखापेक्षा जास्त रस्ते अपघातांची नोंद झाली असून त्यात जवळपास ४६ हजार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. २०२२ ते २०२४ या कालावधीत अपघातांच्या संख्येत सातत्यानं वाढ झाल्याचं सरनाईक यांनी दिलेल्या आकडेवारीतून दिसून येत आहे. वाहनचालकाने मद्यपान केलं आहे का, याची चाचणी करणाऱ्या यंत्रांसोबतच त्यांनी अन्य अंमली पदार्थांचं सेवन केलं आहे का, हेदेखील तपासणारी यंत्रं मागवण्याची प्रक्रिया राज्य सरकार राबवत असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. राज्यानं अद्याप महामार्गांवर इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम लागू केलेली नसल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

अमेरिका युक्रेन यांच्यात आज सौदी अरेबियात चर्चा होणार आहे. सौदी अरेबियाचे राजपुत्र मोहम्मद बिन सलमान यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांची काल संध्याकाळी जेद्दा इथं भेट घेतली. रुबिओ रशिया युक्रेन युद्ध संपवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रयत्नांचा भाग म्हणून युक्रेनच्या शिष्टमंडळाची भेट घेणार असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. अमेरिका आणि युक्रेन यांच्यातल्या खनिज कराराबाबत तपशील निश्चित करणं आवश्यक असल्याचं रुबिओ यांनी म्हटलं आहे. रशियाच्या हवाई संरक्षण दलानं रशियाच्या कुर्स्क आणि इतर भागात ३३७ युक्रेनियन ड्रोन पाडले असून युक्रेनचा गेल्या तीन वर्षांतला हा सर्वात मोठा ड्रोन हल्ला आहे.

**<><><><><><>**

अमेरिकेच्या गुप्तचर विभाग प्रमुख तुलसी गबार्ड त्यांच्या हिंद- प्रशांत महासागर क्षेत्राच्या दौऱ्यात भारतालाही भेट देणार आहेत. यापूर्वी त्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना अमेरिकेत भेटल्या होत्या. शांतता आणि स्वातंत्र्य या उद्दिष्टांसाठी

उभय देशांदरम्यान माहितीचं आदानप्रदान आणि संवाद या विषयावर त्या प्रामुख्यानं उच्चपदस्थांशी चर्चा करतील.

**<><><><><>**

क्रीडा मंत्रालयानं भारतीय कुस्ती महासंघावरचं निलंबन उठवलं आहे आणि मार्गदर्शक तत्त्वं निश्चित केली आहेत. या निर्णयामुळे जॉर्डनमधे अम्मान इथं होणाऱ्या आगामी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी खेळाडूंच्या निवड चाचणीसह इतर उपक्रम पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मंत्रालयानं सर्व आंतरराष्ट्रीय स्पर्धांची निवड नि: पक्षपातीपणे, पारदर्शकपणे आणि क्रीडा संहिता, कुस्ती नियम आणि इतर अधिकृत निर्देशांचे पालन करून करण्याचं तसचं महासंघाला आपल्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये सत्तेत समतोल राखण्याच्या आणि निलंबित किंवा बडतर्फ अधिकाऱ्यांपासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**<><><><><>**

देशभरातल्या तुरुंगांमध्ये दिव्यांग कैद्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसंच दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा २०१६ ची अंमलबजावणी व्हावी या मागण्यांसाठी दाखल झालेल्या जनहित याचिकेवर, सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारकडून उत्तर मागितलं आहे. सामाजिक कार्यकर्ते सत्यन नरावूर यांनी ही याचिका दाखल केली आहे. यावर आज सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यामूर्ती संदीप मेहता यांच्या पीठापुढे सुनावणी झाली. केंद्र सरकारनं चार आठवड्यांत उत्तर द्यावं, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

**<><><><><>**

दिल्लीत आनंद विहार इथं आज पहाटे झोपडपट्टीला लागलेल्या आगीत तिघांचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला.

***//<><><><><><>//***